## निवडक

### उच्च शैक्षणिक संस्थांनी इंधन बचतीबाबत जनजागृती करावी

**मुंबई :** सार्वजनिक वाहनांचा वापर, इंधन बचत, स्वदेशीचा आग्रह, परदेशी दौरे आणि जीवनशैलीत बदल याबाबत उच्च शिक्षण संचालनालयाने विद्यापीठ, महाविद्यालये व शैक्षणिक संस्थांना सूचना दिल्या आहेत. राज्यातील सर्व विद्यापीठे, महाविद्यालये आणि उच्च शैक्षणिक संस्थांनी या आवाहनाची गांभीर्याने दखल घेऊन शैक्षणिक संकुलांमध्ये या विषयावर चर्चासत्रे, शैक्षणिक आणि जनजागृती मोहिमा राबवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. पंतप्रधानांच्या आवाहनानुसार, खासगी वाहनांचा वापर टाळून मेट्रो रेल्वे आणि इतर सार्वजनिक वाहतूक साधनांचा वापर करावा. यामुळे इंधनाची बचत होईल आणि पर्यावरणाचे रक्षण होईल. कारपुलिंगसारख्या संकल्पनांनाही प्रोत्साहन द्यावे, असे निर्देश सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण आणि राज्य सार्वजनिक विद्यापीठांच्या कुलसचिवांना देण्यात आले आहेत.

### मुंबईत झाडांना 'संजीवनी'

**मुंबई :** वाढत्या उष्णतेच्या पार्श्वभूमीवर मुंबईतील वृक्षसंपदेचे संरक्षण करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने विशेष मोहीम हाती घेतली असून सार्वजनिक ठिकाणांवरील झाडांना टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आहे. झाडांची मुळे कोरडी पडून ती कमकुवत होऊ नयेत तसेच झाडे उन्मळून पडण्याच्या घटना टाळाव्यात, यासाठी हा उपक्रम राबवण्यात येत आहे. महापालिकेकडून पिण्यासाठी अयोग्य मात्र झाडांसाठी उपयुक्त असलेल्या पाण्याचा वापर करण्यात येत आहे. जी-दक्षिण विभागातील केशवराव खाड्ये मार्ग तसेच सांताक्रूझ आणि जुहू परिसरात स्वच्छता अभियानासोबत झाडांना पाणी देण्याची विशेष मोहीम राबविण्यात आली.

### विद्युत पंप लावून पाणी उपसा करणाऱ्यांवर कारवाई

**मुंबई :** मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या सातही धरणातील पाणीसाठ्यात घट होत आहे. त्यामुळे पुढील नियोजन म्हणून शुक्रवार १५ मे पासून मुंबईत १० टक्के पाणी कपात लागू करण्यात आली आहे. पाणी कपातीच्या कालावधीत जलवाहिन्यांवर अथवा थेट नळजोडणीवर अनधिकृतरीत्या विद्युत मोटार (पंप) लावून पाणी उपसा करणाऱ्यांविरुद्ध महापालिका प्रशासनाकडून कठोर व अधिक तीव्रतेने कारवाई करावी. अशा प्रकारांमध्ये दोषी आढळणाऱ्यांवर दंडात्मक कारवाईसह फौजदारी गुन्हे दाखल करावेत, असे निर्देश मुंबई महापालिका अतिरिक्त आयुक्त अभिजीत बांगर यांनी दिले.

# चेंबूरमध्ये सोमवारी पाणीपुरवठा विस्कळीत

■ अमर महल ते तुर्भेदरम्यान जलबोगद्याचे काम होणार ■ पाणी गाळून व उकळून पिण्याचे आवाहन

**मुंबई :** मुंबई महापालिकेकडून अमर महाल (हेडगेवार उद्यान) ते तुर्भे निम्नस्तरीय जलाशय दरम्यानच्या जलबोगद्याचे महत्त्वाचे काम हाती घेण्यात येणार आहे. या कामामुळे सोमवार, १८ मे रोजी सकाळी १० ते रात्री १० या १२ तासांच्या कालावधीत 'एम पूर्व' आणि 'एम पश्चिम' विभागातील अनेक भागांमध्ये पाणीपुरवठा विस्कळीत राहणार असून काही भागात कमी दाबाने पाणीपुरवठा होणार आहे. पालिका प्रशासनाने रहिवाशांना आवश्यक तेवढे पाणी साठवून ठेवण्याचे तसेच काटकसरीने वापरण्याचे आवाहन केले आहे.



एम-पूर्व विभागातील प्रभाग क्रमांक १४६, १४७ आणि १४८ तसेच एम पश्चिम विभागातील प्रभाग क्रमांक १५४ व १५५ मधील नागरिकांनी १८ मे ते २५ मे या सात दिवसांच्या कालावधीत पाणी गाळून आणि उकळून वापरावे, अशी खबरदारीची सूचना पालिकेकडून देण्यात आली आहे.

### या भागातील पाणीपुरवठ्यावर परिणाम!

एचपीसीएल रिफायनरी व वसाहत, वरुण बेवरेजेस, बीएआरसी, गव्हाणपाडा, इंडियन ऑईल कंपनी परिसर, बीपीसीएल वसाहत, टाटा वसाहत, नित्यानंद बाग, राणे चाळ, आरसीएफ वसाहत, भारतनगर, जे प्लॉट, हशू अडवाणीनगर, आणिक गाव, एमईसीबी वसाहत, सह्याद्रीनगर, आरएनए उद्यान, म्हाडा इमारती, रॉकलाइन इमारती, विष्णूनगर, व्हिडीओकॉन इमारती, एसजी केमिकल इमारती, प्रयागनगर, ओम गणेशनगर, राहुलनगर आणि अशोकनगर या भागांमध्ये पाणीपुरवठ्यावर परिणाम होणार आहे.

### 'एम पश्चिम' विभागातील बाधित भाग

एमएस इमारती १ ते ३२, बीपीटी, इंडियन ऑईल, टाटा पॉवर, एजीस केमिकल, भारत पेट्रोलियम, आरसीएफ लिमिटेड, चेंबूर कॅम्प, सिंधी कॅम्प, विजय विहार, सुमननगर, भक्ती भवन, चिखलवाडी, समर्थनगर, बसंत पार्क, गांधी बाजार, जनता बाजार, इंदिरानगर, गोल्फ क्लब परिसर, रामटेकडी, तोलाराम टॉवर, कोकणनगर, गणेशनगर, विजयनगर, अशोकनगर, सिंधी सोसायटी, जिल्हाधिकारी वसाहत, मरवली चर्च, आरसी मार्ग, माहूल गाव, आंबापाडा, म्हैसूर वसाहत, वाशी गाव, वाडवली, लक्ष्मीनगर, जिजामातानगर, रमाबाई वसाहत, महात्मा फुलेनगर, अजंठा वसाहत, मुकुंदनगर, पंजाबी चाळ, नागेवाडी, छेडानगर यात पाणीपुरवठा कमी दाबाने होणार आहे.

# ६ महिन्यांहून जास्त कारावास देऊ शकत नाही!

उच्च न्यायालयाचा मोठा निर्णय; चेक बाऊन्स प्रकरण

**मुंबई :** महानगर दंडाधिकारी चेक बाऊन्स प्रकरणात आरोपीने नुकसानभरपाई न दिल्यास त्याला ६ महिन्यांहून जास्त कालावधीची अतिरिक्त कारावासाची शिक्षा देऊ शकत नाहीत, असा निर्वाळा उच्च न्यायालयाने एका प्रकरणात दिला. कलम १३८ अंतर्गत चेक बाऊन्स प्रकरणांमध्ये हा अत्यंत महत्त्वाचा निर्णय मानला जात आहे. न्यायमूर्ती एन. जे. जमादार यांच्या एकलपीठाने हा निर्णय दिला.

एका व्यापाऱ्याने आरोपी संचालक असलेल्या कंपनीला २२ कोटींपेक्षा जास्त किमतीचा माल पुरवला होता. हा व्यवहार पूर्ण करण्यासाठी दिलेले ६० धनादेश (चेक) बँकेत वटले नाहीत. या प्रकरणी दंडाधिकाऱ्यांनी आरोपीला प्रत्येक प्रकरणात १५ महिने साध्या कारावासाची तसेच नुकसानभरपाई न भरल्यास प्रत्येक तक्रारीत आणखी १२ महिन्यांच्या शिक्षेचे आदेश दिले होते.

### अतिरिक्त शिक्षा बेकायदेशीर

१२ महिन्यांची अतिरिक्त शिक्षा देणे हे भारतीय दंड संहितेच्या कलम ६५ आणि फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३० मधील कायदेशीर तरतुदींचे थेट उल्लंघन आहे. अतिरिक्त शिक्षा जास्तीत जास्त ६ महिनेच असू शकते. दंडाधिकाऱ्यांनी दिलेली १२ महिन्यांची डिफॉल्ट शिक्षा पूर्णपणे बेकायदेशीर आहे, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले.

## सावलीमुक्त दिवस



सूर्य काही दिवस थेट डोक्यावर आल्यावर उन्हातही सावली साथ सोडून जाते. शुक्रवारी मुंबईकरांनीही सावलीमुक्त दिवस अनुभवला. (छाया : सलमान अन्सारी)

# ट्युशन फी, डेव्हलपमेंट फीची माहिती देणे बंधनकारक

उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांचे महाविद्यालयांना निर्देश

**मुंबई :** उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रवेश शुल्काबाबत संपूर्ण आणि अद्ययावत माहिती उपलब्ध करून द्यावी लागणार आहे. याबाबतचे निर्देश सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण आणि राज्य सार्वजनिक विद्यापीठांच्या कुलसचिवांना उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी दिले आहेत.

बारावी निकालानंतर सर्व महाविद्यालयांमध्ये पदवी अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. या पार्श्वभूमीवर, महाविद्यालयांनी विद्यापीठ किंवा शुल्क नियामक प्राधिकरण यांच्या नियमानुसार व मान्यतेनुसार आकारण्यात येणारे प्रवेश शुल्क, ट्युशन फी, डेव्हलपमेंट फी व इतर शुल्काची अद्ययावत माहिती कॉलेजच्या सूचना फलकावर लावणे अनिवार्य आहे तसेच प्रवेश शुल्कासह संपूर्ण शुल्काची माहिती बंधनकारक आहे.

### तक्रारी निर्माण होणार नाहीत, याची काळजी घ्या!

शुल्काबाबतची माहिती सूचना फलकावर आणि प्रवेश माहितीपुस्तिकेमध्ये दिसण्याबाबतची खबरदारी घेण्याची जबाबदारी संबंधित विद्यापीठ आणि संबंधित विभागीय सहसंचालक यांच्यावर राहणार आहे. सर्व विभागीय सहसंचालक आणि राज्य सार्वजनिक विद्यापीठांच्या कुलसचिवांनी ही बाब आपल्या अधिनस्त आणि संलग्नित महाविद्यालयांना आपल्या स्तरावरून तत्काळ सूचित करावी, असे निर्देश उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांनी दिले आहेत. या संदर्भात कोणत्याही प्रकारची तक्रार उद्भवणार नाही, याची दक्षता संबंधित महाविद्यालयांनी घ्यावी तसेच कोणत्याही प्रकारची तक्रार उद्भवल्यास संबंधित महाविद्यालय जबाबदार राहील, असे उच्च शिक्षण संचालनालयाने स्पष्ट केले आहे.

### 'एसआयआर'वर देखरेखीसाठी 'टास्क फोर्स' स्थापन करा!

**मुंबई :** निवडणूक आयोगाने महाराष्ट्रातील मतदार याद्यांच्या सखोल फेरतपासणी (एसआयआर) प्रक्रियेची घोषणा केल्यानंतर समाजवादी पक्षाचे भिवंडीचे आमदार रईस शेख यांनी या संदर्भात महाविकास आघाडीने राज्यस्तरीय कृती दल (टास्क फोर्स) स्थापन करण्याची मागणी केली आहे. पश्चिम बंगाल आणि बिहारमध्ये मतदार वगळल्याचा दावा करत त्यांनी महाराष्ट्रातही अशी परिस्थिती निर्माण होऊ शकते, असा इशारा दिला आहे. त्यांनी याबाबत काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, खासदार संजय राऊत, राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांना पत्र लिहिले आहे.

# राज्यात बोगस दातांच्या डॉक्टरांना बसणार आळा

महाराष्ट्र राज्य दंत परिषदेकडून मराठी नोंदणी प्रमाणपत्रे जारी

**मुंबई :** महाराष्ट्र राज्य दंत परिषद (एमएसडीसी) यांनी राज्यातील दंतवैद्यकीय सेवांमध्ये पारदर्शकता, उत्तरदायित्व व नियामक अनुपालन सुनिश्चित करण्याच्या उद्देशाने 'नो युअर डेंटल प्रॅक्टिशनर (केवायडी)' हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. या उपक्रमाचा मुख्य हेतू राज्यात बेकायदेशीर, अप्रमाणित व नोंदणीविना चालणाऱ्या दंतप्रॅक्टिसला आळा घालणे हा आहे.

या उपक्रमांतर्गत परिषदेमार्फत प्रत्येक नोंदणीकृत दंतचिकित्सकाला एक अधिकृत केवायडी शीट प्रदान करण्यात येत आहे. या शीटवर समाविष्ट असलेल्या अद्वितीय क्यूआर कोडद्वारे सर्वसामान्य नागरिक, रुग्ण व संबंधितांना दंतचिकित्सकाची नोंदणी स्थिती, वैधता, स्पेशालिटी व इतर आवश्यक तपशील त्वरित व विश्वसनीय पद्धतीने पडताळता येणार आहे. यामुळे रुग्णांना उपचारासंदर्भात माहितीआधारित निर्णय घेणे सुलभ होऊन दंतसेवांबाबतचा सार्वजनिक विश्वास अधिक दृढ होईल तसेच बोगस दंतवैद्य शोधणे सोपे होईल.

परिषदेकडून सर्व नोंदणीकृत दंतचिकित्सकांना निर्देश देण्यात येत आहेत की, ही केवायडी क्यूआर शीट त्यांच्या दवाखान्याच्या प्रवेशद्वारावर अथवा प्रतीक्षागृहात स्पष्टपणे व ठळकपणे प्रदर्शित करावी.

### व्यावसायिक प्रतिष्ठा, विश्वासार्हतेसाठी महत्त्वपूर्ण पाऊल

महाराष्ट्र राज्य दंत परिषदेचे अध्यक्ष डॉ. नरेंद्र काळे यांनी नमूद केले की, हा उपक्रम हा सार्वजनिक हितसुरक्षेसाठी, दंतव्यवसायातील शुचित्व राखण्यासाठी तसेच व्यावसायिक प्रतिष्ठा व विश्वासार्हता अबाधित ठेवण्यासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. यासोबतच, परिषदेमार्फत दि. १ मे २०२६ पासून इंग्रजीसह मराठी नोंदणी प्रमाणपत्रे जारी करण्यात येणार असल्याची अधिकृत घोषणा करण्यात येत आहे. वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांचे हस्ते या नवीन नोंदणी प्रमाणपत्राचे विमोचन करण्यात आले तसेच 'हँडबूक ऑफ प्राक्टिशनर गाइडलाइन्स' या महाराष्ट्र स्टेट डेंटल कॉन्सिलच्या वतीने प्रकाशित करण्यात आलेल्या पुस्तिकेचे विमोचन करण्यात आले. राज्यात हा असा उपक्रम करणारी स्टेट डेंटन कौन्सिल ही पहिली वैद्यकीय परिषद आहे.

### डॉक्टरांसाठी पुस्तिका मार्गदर्शक

या पुस्तिकेत दंतवैद्यक व्यवसाय करणाऱ्या डॉक्टरांसाठी उपयुक्त माहिती आहे. यामध्ये सध्याचे दंतवैद्यक व्यवसायासंदर्भातील कायदे, नैतिक आचरण, क्लिनिक सुरू करताना आवश्यक कागदपत्रे व परवानगी, रुग्णांची माहिती, संमतीपत्र, आपत्कालीन व्यवस्थापन, औषधींचा वापर, आदर्श प्रिस्क्रीप्शन, प्रदूषण नियंत्रण मंडळाचे नियम इत्यादी सर्व माहिती उपलब्ध आहे.

# लाड समितीच्या शिफारशी लागू करण्यात दिरंगाई

**मुंबई :** रुग्णालयीन स्वच्छता, स्मशानभूमी इत्यादी ठिकाणी स्वच्छतेची बाबदारी सफाई कामगार करत असतात. तरी त्यांना वारसा हक्क लागू करत सफाई कामगार घोषित करण्याची शिफारस लाड समितीने केली आहे. मात्र, शासन निर्णय जारी होऊन ही वेळकाढूपणा केला जात आहे. तरी या प्रकरणी चौकशी करण्याचे आदेश जारी करण्यात यावे, असे पत्र मुंबई महापालिका आयुक्त अश्विनी भिडे यांना लिहिल्याचे म्युनिसिपल कर्मचारी कामगार सेनेकडून सांगण्यात आले.

महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्यावतीने लाड समितीच्या शिफारशींच्या अनुषंगाने सफाई कामगारांच्या वारसा हक्काच्या अंमलबजावणीबाबत २४ फेब्रुवारी २०२३ रोजी सर्वसमावेशक सुधारीत शासन निर्णय निर्गमीत करण्यात आला आहे.शासकीय/ निमशासकीय/महानगरपालिका/ नगरपालिका/ नगरपरिषदा/ कटक मंडळे/राज्य शासनाची महामंडळे/ राज्य शासनाच्या स्वायत्त संस्था/ पॅरास्टेटल संस्था/ अनुदानित संस्था/शासकीय रुग्णालये, वैद्यकीय महाविद्यालये, पशुवैद्यकीय महाविद्यालये, आस्थापनांमधील शौचालय स्वच्छता, मलःनिसारण व्यवस्था, नाली-गटारे, ड्रेनेज तसेच रुग्णालयीन स्वच्छता, शवविच्छेदनगृह तसेच साफसफाईची कामे करणाऱ्या विविध पदांचा समावेश करून कामगाराची नव्याने व्याख्या तयार करण्याचा निर्णय घेतला आहे.

**'त्या' कर्मचाऱ्यांना सफाई कर्मचारी घोषित करा**

पालिकेतील मलनिःसारण, मुख्य मलनिःसारण, बाजार, स्मशानभूमी, सार्वजनिक व उपनगरीय रुग्णालये, आरोग्य खाते, वाहन स्वच्छक, घाणीशी संबंधित-स्वच्छतेची कामे करणाऱ्या कर्मचाऱ्यांना सफाई कामगार घोषित करावे, अशी मागणी संघटनेने केली आहे.

### कामगार संघटनेचे आयुक्तांना पत्र

#### कामगार खात्याकडून दिरंगाई

शासन आदेश आल्यानंतर सुमारे साडेतीन वर्षांचा कालावधी होत आला तरी, सामान्य प्रशासन विभाग तसेच प्रमुख कामगार अधिकारी खाते या विषयी जाणीवपूर्वक दिरंगाई करत असल्याने चौकशीचे आदेश द्यावेत, अशी मागणी म्युनिसिपल कर्मचारी कामगार सेनेचे अध्यक्ष बाबा कदम व उपाध्यक्ष डॉ. संजय कांबळे-बापेरकर यांनी पालिका आयुक्त अश्विनी भिडे यांच्याकडे केली आहे.

# कुसुमाग्रज प्रतिष्ठानला अनुदान

**मुंबई :** नाशिक येथील कुसुमाग्रज प्रतिष्ठानला विविध वाङ्मयीन उपक्रमांचे आयोजन करण्यासाठी यंदाच्या आर्थिक वर्षापासून १० लाखांचा निधी देण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला.

मराठी साहित्याचा प्रसार आणि संवर्धनासाठी अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ, महाराष्ट्र साहित्य परिषद-पुणे, मुंबई मराठी साहित्य संघ-मुंबई, विदर्भ साहित्य संघ-नागपूर, मराठवाडा साहित्य परिषद-छत्रपती संभाजीनगर, कोकण मराठी साहित्य परिषद-रत्नागिरी, दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा, कोल्हापूर या सात संस्थांना दरवर्षी १० लाखांचे अनुदान देण्यात येते.

# सिंधुदुर्ग, रत्नागिरीसाठी सिंधुरत्न समृद्ध योजना

**मुंबई :** सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी जिल्ह्यांतील नैसर्गिक साधनसंपत्तीचे परिणामकारक नियोजन करून दोन्ही जिल्ह्यांच्या विकासासाठी 'सिंधुरत्न समृद्ध योजना २.०' सन २०२८-२९ पर्यंत आणखी तीन वर्षांसाठी राबवण्यास मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. योजना कालावधीत दोन्ही जिल्ह्यांसाठी प्रत्येकी २०० कोटी रुपयांचा निधी देण्यात येणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अर्थसंकल्पीय भाषणात ही योजना पुढील तीन वर्षांसाठी प्रस्तावित करण्याची घोषणा केली होती. त्यानुसार २०२८-२९ पर्यंत ही योजना राबवण्यात येणार आहे. दोन्ही जिल्ह्यातील नैसर्गिक साधनसंपत्ती, समुद्रकिनारा यांच्या वापरातून पर्यटन व मत्स्य व्यवसायाला चालना देऊन रोजगार निर्मिती करणे व दरडोई उत्पन्नात वाढ करण्याचे नियोजन आहे.

या योजनेतून बंदर धक्का आणि पर्यटन नौका केंद्राच्या ठिकाणी मनोरंजन, सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन आणि जलक्रीडाकरिता पायाभूत सुविधा करणे, पर्यटन स्थळांच्या ठिकाणी मूलभूत व्यवस्था निर्माण करणे, अविकसित बॅक वॉटर परिसरात जलक्रीडा प्रकारांना चालना देण्यासाठी मूलभूत सुविधा विकास करणे, मासळी उतरवण्याचे केंद्र विकसित करणे, सुविधा, मत्स्यबिज उत्पादन केंद्र, साठवणूक, विक्री केंद्र व मत्स्यालय उभारणे ही कामे करता येणार आहेत.

### नदी पुनरुज्जीवन प्रकल्पासाठी मोफत जमीन

पुणे नदी पुनरुज्जीवन प्रकल्पांतर्गत मुळा-मुठा नदीचा विकास करण्यासाठी पुणे महापालिकेस तीन शासकीय जमिनी विनामूल्य देण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. या निर्णयामुळे पुणे महानगरपालिकेसाठी ११६ कोटी ६३ लाख ८२ हजार ३८६ रुपयांची कब्जेहक्काची रक्कम माफ होणार आहे.

## तक्रार निवारण व्यवस्थापन प्रणाली विकसित

# जुन्या इमारतींच्या पुनर्विकास प्रकल्पातील रहिवाशांना दिलासा

**मुंबई :** दक्षिण मुंबईतील जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकास प्रकल्पात मूळ भाडेकरू, रहिवासी यांना विकासकाकडून मिळणारे संक्रमण भाडे, सदनिकांचा ताबा व इतर वादांसंबंधीच्या तक्रारींचे निवारण आता लवकर होणार आहे.

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने विकसित केलेल्या तक्रार निवारण व्यवस्थापन प्रणालीचे उद्घाटन म्हाडाचे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जयस्वाल यांच्या हस्ते करण्यात आले. यामुळे पुनर्विकास प्रकल्पातील रहिवाशांना दिलासा मिळणार आहे.



### भाडेकरूंना पुनर्वसनाचा लाभ मिळणार

म्हाडाच्या उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकास प्रकल्पांमध्ये भाडेकरू, रहिवासी यांना वेळेवर भाडे न मिळणे, विकासकांकडून (डेव्हलपर) होणारी दिरंगाई आणि इतर समस्यांच्या जलद निराकरणासाठी ही वेळबद्ध यंत्रणा निर्माण करण्यात आली आहे. पुनर्विकास प्रकल्प वेळेत पूर्ण व्हावेत आणि भाडेकरूंना पुनर्वसनाचा लाभ मिळावा, यासाठी या प्रणालीची मदत होणार आहे.

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या फ दक्षिण विभागाच्या दादर पूर्व येथील विभागीय कार्यालयात हा कार्यक्रम झाला. यावेळी जयस्वाल यांनी संबंधित अधिकाऱ्यांचे अभिनंदन केले व म्हणाले की, तक्रार निवारण व्यवस्थापन प्रणाली, या डिजिटल यंत्रणेच्या माध्यमातून भाडेकरू आणि रहिवाशांच्या समस्या वेळेत, पारदर्शकपणे आणि संवेदनशीलतेने सोडवण्यासाठी म्हाडाने उचललेले एक लोककेंद्रित पाऊल आहे.

तंत्रज्ञानाच्या माध्यमातून म्हाडाच्या उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकास प्रकल्पात मूळ भाडेकरू/ रहिवासी यांना विकासकाकडून मिळणारे संक्रमण भाडे व इतर तक्रारींचे निवारण अधिक जलदगतीने करून नागरिकांना अधिक चांगल्या सेवा देणे शक्य होईल.

हा उपक्रम म्हाडाच्या उपकरप्राप्त इमारतींतील भाडेकरू, रहिवासी यांना अधिक प्रभावी, पारदर्शक आणि वेळेत सेवा देण्याच्या म्हाडाच्या बांधिलकीचा भाग आहे तसेच ते पुढे म्हणाले की, प्रत्येक नागरिकाची समस्या ऐकली जावी आणि तिचे वेळेत निवारण व्हावे, हीच या उपक्रमामागची खरी भावना असल्याचे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले.